# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

## परिपत्रक क्र. १२४/२०२५

**विषय : सर्व अध्यापक आणि पीएच्.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन लेख (Research Papers) प्रसिद्ध करताना संशोधन पत्रिकेत संबंधित संशोधन केंद्रांचे नाव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करणेबाबत...**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये कार्यरत अध्यापक विविध विषयात संशोधन करून संशोधन लेख (Research Paper) प्रसिद्ध करत असतात. तसेच मा. कुलगुरू यांचे आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे पीएच्.डी. करणारे विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. गोषवारा/प्रबंध जमा करताना Refereed Journal मध्ये कमीत कमी एक संशोधन लेख ( Research Paper) प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे. त्यास अनुसरून संशोधक विद्यार्थी व संबंधित संशोधन मार्गदर्शक संयुक्तरित्या संशोधन लेख ( Research Paper) प्रसिद्ध करत असतात.

परंतु काही अध्यापक व पीएच्.डी. विद्यार्थ्यांकडून संशोधन लेख ( Research Paper) प्रसिद्ध करताना संबंधित विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करत नाहीत.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग/मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कार्यरत अध्यापक व पीएच्.डी. विद्यार्थ्यांकडून संशोधन लेख (Research Paper) प्रसिद्ध करताना संबंधित विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करावे.

यापुढे संशोधन पत्रिकेत सदरील नावे नमूद नसल्यास गोषवारा/प्रबंधास विद्यापीठाकडून मान्यता देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/1091 )
दिनांक : 02/05/2025 )

2/5/2025
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ<br>२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ | आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शक व पीएच्.डी. संशोधकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी. |